मंगळवार दि. ०७ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३०६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांचे राष्ट्रहितासाठीचे बलिदान व्यर्थ जाणार नाही- राज्यपाल हरिभाऊ बागडे

**जालना – प्रतिनिधी**

डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांनी राष्ट्रहितासाठी केलेला त्याग हा सर्वोच्च असून राष्ट्रहितासाठीचे त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी आज ( दि. ६) येथे केले.

डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी विचारमंच तर्फे गणेश भवन सभागृहात आयोजित व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. माजी नगराध्यक्ष संगिताताई गोरंट्याल ह्या अध्यक्षस्थानी होत्या. आमदार नारायण कुचे, महापौर वंदना मगरे, उद्योजक घनश्यामदास गोयल, भाजपचे जिल्हा महानगराध्यक्ष भास्कर दानवे आदींची यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.विचारमंचावर व्याख्यानमालेचे स्वागताध्यक्ष तथा माजी आमदार कैलास गोरंट्याल, कार्याध्यक्ष राहूल लोणीकर, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी विचारमंचचे अध्यक्ष विरेंद्रप्रकाश धोका, वक्ते सुरेश केसापूरकर, मनपाचे स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, महावीर ढक्का, संतोष माधोवले,रामेश्वर भांदरगे, सुजीत जोगस आदींची उपस्थिती होती.



यावेळी बोलतांना राज्यपाल हरिभाऊ बागडे पुढे म्हणाले की, हिंदूत्ववादी विचारसरणीचे डॉ. शामा प्रसाद मुखर्जी हे नेहरू मंत्रिमंडळात मंत्री होते. नेहरू व पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान लियाकत अली यांच्यात झालेल्या कराराचा निषेध करत त्याच मुद्द्यावरून त्यांनी मंत्रिमंडळाचा राजीनामा देत ते बाहेर पडले. पुढे त्यांनी जनसंघाची स्थापना केली. त्यांनी भारत हा अखंड राहावा, यासाठी पुढाकार घेतला, जम्मू काश्मीरमधील ३७० कलमास विरोध केला. एक देश दोन संविधान भूमिकेला कडाडून विरोध केला. राष्ट्रीय एकता व अखंडिततेसाठी त्यांनी बलिदान दिले. डॉ. मुखर्जी यांनी राष्ट्रहितासाठी केलेला सर्वोच्च त्याग हा अमूल्य असून त्यांचे जीवन देशभक्ती व कर्तव्यनिष्ठेचा आदर्श आहे, त्यांचे राष्ट्रहितासाठीचे योगदान हे प्रेरणादायी असून त्यांचे राष्ट्रहितासाठीचे कार्य व विचार हे जनतेसमोर मांडले जात आहेत, राष्ट्रहितासाठीचे त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, असे सांगून राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी डॉ मुखर्जी यांच्या जीवनकार्याचा उहापोह केला. प्रास्ताविक करतांना भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी विचारमंचचे अध्यक्ष विरेंद्रप्रकाश धोका यांनी डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांच्या स्मृतिला उजाळा देत पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते अनावरण झालेल्या जालना शहरातील शामा प्रसाद मुखर्जी उद्यानात त्यांचा पूर्णाकृती पुतळा बसवून उद्यान विकसित करण्याची मागणी केली, डॉ. शामा प्रसाद मुखर्जी उद्यान व पुतळ्यासंर्भात केलेला संघर्ष धोका यांनी यावेळी नमूद केला.

प्रारंभी राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीप प्रज्वलित करून व्याख्यानमालेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मनीष तवरावाला यांनी केले.

यावेळी भाजपचे पदाधिकारी, महानगर पालिकेतील विषय समित्यांचे सभापती, नगरसेवक, भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याचा निर्धार**

यावेळी बोलताना माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी जालना महानगर पालिकेने डॉ.शामा प्रसाद मुखर्जी उद्यानात त्यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याचा ठराव पारित केला आहे, नगरसेवक विरेंद्रप्रकाश धोका यांनी या पुतळ्यासाठी तसेच उद्यान सुशोभिकरणासाठी जो संघर्ष केला आहे तो कौतुकास्पद असल्याचे सांगितले. भास्कर दानवे यांनी डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच आमदार नारायण कुचे यांनी जालना शहरात डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे सांगितले तर महापौर वंदना मगरे यांनी आपल्या महापौरपदाच्या कार्यकाळात डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यात येईल,असे जाहीर केले.

## पावसाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणा २४ बाय ७ अलर्ट मोडवर ठेवा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### राज्यातील पावसाच्या परिस्थितीचा मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षातून घेतला आढावा

**मुंबई – प्रतिनिधी**

मुंबईसह किनारी भागातील जिल्ह्यात वाऱ्याचा ताशी वेग ५० ते ७० किलोमीटर प्रति तास असण्याची शक्यता आहे. यासोबतच आज दुपारी ३ ते ४.३० वाजे दरम्यान समुद्राला भरती येण्याची शक्यताही आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी २४ बाय ७ अलर्ट मोडवर राहून आपत्कालीन परिस्थिती आल्यास तातडीने मदत कार्य करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. राज्यभरात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने आज आणि उद्या अत्यावश्यक काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये , असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. राज्य आपत्ती नियंत्रण कक्षामध्ये आयोजित बैठकीत राज्यातील पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबई आणि किनारी भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह



पाऊस अपेक्षित आहेत. अपेक्षित उच्च भरतीच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांना 'अलर्ट मोड'वर ठेवण्यात आले आहेत. पुराची परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने एसडीआरएफ आणि एनडीआरएफ ची पथके रवाना करण्यात यावी. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना तातडीने मदत मिळेल, याची काळजी घ्यावी. मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील अडथळे तात्काळ दूर करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याशी समन्वय साधून महामार्गावरील मलबा हटविण्यात यावा. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन संभाव्य दरड कोसळणाऱ्या ठिकाणी पथके सज्ज ठेवावीत. तसेच मुंबई–गोवा महामार्गावर यावेळी अनपेक्षित ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून दरडीचा मलबा तात्काळ हटविण्यात यावा. कुठल्याही परिस्थितीत वाहतुकीचे कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**नाशिक व त्रंबकेश्वर परिसरातील पर्यटकांची विशेष खबरदारी घ्यावी**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अरबी समुद्रावर बनत असलेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिक जिल्ह्याच्या बऱ्याचशा भागात उद्या ढगफुटी सदृश्य पाऊस होण्याची दाट शक्यता आहे. हा पाऊस बऱ्यापैकी त्र्यंबकेश्वर व आजूबाजूच्या परिसरात पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून सुमारे ३०० मिलिमीटर पाऊस अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत नाशिक जिल्हा प्रशासनाने सज्ज राहून सखल भागात पाणी साचणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्यात. कुठेही जीवित हानी होणार नाही, याबाबतही दक्ष रहावे. (पान २ वर)

## मनातील भीती काढून टाकणे हाच प्रगतीचा एकमेव मार्ग- डॉ. कासट

### रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोचा पदग्रहण सोहळा थाटात संपन्न




**जालना –प्रतिनिधी**

जीवनात कोणत्याही क्षेत्रात सर्वोच्च शिखर किंवा ध्येय गाठायचे असेल, तर आधी मनाची तयारी करून भीतीवर विजय मिळवणे आवश्यक आहे. कोणत्याही क्षेत्रात काम करताना जेव्हा तुम्ही तुमच्या मनातील भीती पूर्णपणे काढून टाकता, तेव्हा तुमचे निर्णय आणि तुमची निवड अचूक ठरते. जगातील मोठे यशस्वी लोक हे काही जन्मापासून निर्भय नसतात, तर ते स्वतःच्या भीतीवर मात करण्याची क्षमता विकसित करतात आणि म्हणूनच ते यशाचे एव्हरेस्ट सर करू शकतात. माणूस कधीही अपंगत्वामुळे किंवा परिस्थितीमुळे अपयशी ठरत नाही, तर तो मनात बाळगलेल्या भीतीमुळे मागे पडतो, असे प्रतिपादन प्रख्यात प्रेरक वक्ते डॉ. लक्ष्मीकांत कासट यांनी यांनी (पान २ वर)

## खरीप हंगाम २०२६-२७ ज्वारी, बाजरी, मका, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल या पिकांसाठी पीकस्पर्धा जाहीर

### प्रयोगशील शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर – प्रतिनिधी**

राज्यातील विविध पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने पीकस्पर्धा सन २०२६–२७ जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव होणार असून, त्यांच्या अनुभवाचा लाभ इतर शेतकऱ्यांनाही मिळणार आहे. खरीप हंगाम २०२६ अंतर्गत ज्वारी, बाजरी, मका, तुर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या पिकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. मुग व उडीद पिकांसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६, तर इतर सर्व पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२६ आहे. स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांना प्रति पीक रु. ३००, तर आदिवासी गटासाठी रु. १५० प्रवेश शुल्क निश्चित करण्यात आले आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी या पीकस्पर्धेत सहभागी व्हावे. तसेच अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर सुनील वानखेडे यांनी केले आहे.

## जालना येथे भाजपाच्या वतीने डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी यांची १२५ वी जयंती उत्साहात साजरी

**जालना – प्रतिनिधी**

भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत आणि देशाच्या एकात्मतेसाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त जालना शहरातील डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यान येथे त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने कार्यकर्ता संमेलन, वृक्षारोपण तसेच अनेक वर्षांपासून बंद असलेले डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यान भारतीय जनता पक्षाच्या वतीने पुन्हा खुले



करण्यात आले. उद्यान खुले होताच उपस्थित कार्यकर्ते व नागरिकांनी आनंद व्यक्त केला. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीच्या दिवशीच त्यांच्या नावाचे उद्यान पुन्हा नागरिकांसाठी खुले होणे ही जालनेकरांसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

यावेळी जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, माजी आ.कैलास गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश सचिव राहुल लोणीकर, महापौर वंदना मगरे, मनपा आयुक्त अंजली शर्मा, मा.जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, रामेश्वर पाटील भांदरगे, युवानेते अक्षय गोरंटयाल, सभापती अशोक पांगारकर, संगीताताई गोरंट्याल, संध्याताई देठे, रमेश गौरक्षक, धनराज काबलिये आदींची प्रमुख उपस्थिती होती. यानंतर झालेल्या कार्यकर्ता संमेलनात डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी दिलेला ''एक देश में दो विधान, दो प्रधान, दो निशान नहीं चलेंगे'' हा राष्ट्रहिताचा संदेश उपस्थित कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. देशाच्या अखंडतेसाठी आणि संविधानाच्या समान अंमलबजावणीसाठी डॉ. मुखर्जी यांनी दिलेला संघर्ष भारतीय राजकारणातील एक महत्त्वपूर्ण अध्याय आहे. विशेषतः जम्मू–काश्मीरमधील कलम ३७० आणि ३५अ हटवून ''एक देश, एक संविधान'' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने घेतला. हा निर्णय डॉ. मुखर्जी यांच्या विचारांना खरी आदरांजली असल्याचे यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन करताना सांगितले.यावेळी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्त्याच्या मागणीसाठी रहिवाशांचा मुख्य रस्त्यावर ठिय्या







### महानगरपालिका प्रशासन व पोलिसांच्या मध्यस्थीने आंदोलन मागे

**जालना –प्रतिनिधी**

शहरातील महानगरपालिका हद्दीत असलेल्या सोरटीनगर, मयुरी पार्क, कृष्णबन सोसायटी या परिसराला जोडणाऱ्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे झाले असून, भर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत. महानगर पालिका प्रशासनास वेळोवेळी निवेदने देवूनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी सोमवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास जालना–छत्रपती संभाजीनगर हा मुख्य रस्त्यावर ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली होती. दरम्यान, महानगरपालिका प्रशासन, या भागातील नगरसेवक यांच्या आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

शहराच्या मध्यवस्तीत तसेच रत्नप्रभा मोटर्सच्या बाजुला असलेल्या मयुरी पार्क, कृष्णबन सोसायटी व सोरटी नगर या कॉलनीमध्ये जाण्यासाठी येथील रहिवाशांना मागील अनेक वर्षांपासून रस्ता नसल्याने वेळोवेळी महानगरपालिका तसेच या परिसरातील नगरसेवक यांना निवेदन दिले. त्याचबरोबर लोकप्रतिनिधींना भेटून विनंत्या केल्या. तरी देखील रस्ता निर्मितीसाठी कोणीही लक्ष दिले नाही. भर पावसाळ्यात या परिसरातील नागरिकांना शाळकरी मुलांना मोठमोठ्या खड्ड्यामधून कसरत करीत घर गाठावे लागत आहे. यापरिसरातील अनेक नागरिक विविध कंपन्या तसेच नवीन एमआयडीसीमध्ये नोकरी करत असल्याने त्यांना रात्री–बेरात्री या रस्त्यावरुन मार्गक्रमण करावे लागत आहे. त्यातच पावसाळ्याचे दिवस असल्याने मोठे हाल होत आहेत. अपघाताचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी सोमवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास जालना–छत्रपती संभाजीनगर हा मुख्य रस्त्यावर ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनामुळे मोठ्या प्रमाणात वाहनांच्या रांगा लागल्या. महानगरपालिका प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी तोंडी तर येथील नगरसेवकांनी महापालिकेच्या बैठकीत मुद्दा (पान २ वर)

# संपादकीय....

## नियमांची अंमलबजावणी की निवडक कारवाई? प्रश्न विश्वासाचा आहे

जालना शहरातील एका खासगी रुग्णालयासमोर आजारी आईला उपचारासाठी आणलेल्या वाहनचालकावर वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी दंडात्मक कारवाई झाल्याची घटना अनेक प्रश्न उपस्थित करते. या प्रकरणाचा केंद्रबिंदू दंडाची रक्कम नसून, कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान आणि निष्पक्षपणे होते का, हा आहे.

वाहतूक नियमांचे पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. रुग्णालय असो, बाजारपेठ असो किंवा सार्वजनिक रस्तानो पार्किंग असेल तर नियमांचे पालन अपेक्षितच आहे. पोलिसांना कारवाई करण्याचा अधिकारही कायद्याने दिलेला आहे. त्यामुळे केवळ ''रुग्ण होता'' या कारणावरून नियमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करता येणार नाही. कायद्याचा सन्मान ही सुसंस्कृत समाजाची पहिली अट आहे.

परंतु या प्रकरणात उपस्थित झालेला प्रश्न वेगळा आहे. जर त्याच परिसरात अनेक वाहने उभी होती आणि कारवाई फक्त एका वाहनावर झाली असेल, तर नागरिकांच्या मनात निवडक अंमलबजावणीबाबत शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. कायद्याची ताकद त्याच्या कठोरतेत नसते; ती त्याच्या समान आणि पारदर्शक अंमलबजावणीत असते.

वाहतूक व्यवस्थापनात विवेकाधिकार आणि मनमानी यांच्यामध्ये अत्यंत सूक्ष्म रेषा असते. एखाद्या पोलीस कर्मचाऱ्याने परिस्थितीचा विचार करून निर्णय घेणे वेगळे, तर समान परिस्थितीत वेगवेगळे निकष लावणे वेगळे. यामुळेच कारवाईचे निकष स्पष्ट आणि सर्वांसाठी एकसमान असणे आवश्यक आहे.

रुग्णालय परिसर हा इतर सार्वजनिक ठिकाणांपेक्षा अधिक संवेदनशील असतो. अनेकदा गंभीर रुग्णांना काही मिनिटांत उपचार मिळणे आवश्यक असते. अशा वेळी वाहतूक नियम शिथिल करावेत, असे म्हणणे योग्य ठरणार नाही; मात्र रुग्ण उतरविण्यासाठी निश्चित जागा, अल्पकालीन पार्किंग व्यवस्था किंवा आपत्कालीन वाहनांसाठी स्वतंत्र सुविधा निर्माण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संघर्ष टाळण्याचा हा अधिक शाश्वत मार्ग ठरू शकतो. या घटनेने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर आणला आहे. शहरातील अतिक्रमणे, फेरीवाल्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी, नियमबाह्य वाहनांची वर्दळ आणि अनधिकृत पार्किंग या समस्यांवर सातत्यपूर्ण आणि व्यापक कारवाई होत आहे का? जर मोठ्या समस्यांकडे दुर्लक्ष करून केवळ सहज उपलब्ध वाहनांवर कारवाई होत असल्याची भावना निर्माण झाली, तर कायद्यावरील लोकांचा विश्वास कमी होऊ शकतो.

आज तंत्रज्ञानामुळे ई-चलन, सीसीटीव्ही आणि डिजिटल पुरावे उपलब्ध आहेत. त्यामुळे या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ चौकशी करून त्या वेळचे सीसीटीव्ही फुटेज तपासणे, परिसरातील इतर वाहनांवरही कारवाई झाली होती का, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. चौकशीमुळे संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही आणि तक्रारदारालाही न्याय मिळेल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जनतेसमोर वस्तुस्थिती स्पष्ट होईल.

कायदा कठोर असला तरी त्याचा चेहरा संवेदनशील असावा. पोलिसांचा अधिकार आणि नागरिकांचा विश्वास ही लोकशाहीची दोन महत्त्वाची चाके आहेत. त्यापैकी एकही डगमगले तर व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

या घटनेत दोष कोणाचा आहे, याचा अंतिम निर्णय चौकशीतूनच स्पष्ट होईल. मात्र या निमित्ताने एक गोष्ट अधोरेखित होतेनियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत, कारवाई पारदर्शक असली पाहिजे आणि कायद्याबरोबरच मानवी संवेदनांनाही तितकेच महत्त्व दिले गेले पाहिजे. तेव्हाच कायद्याचा धाक आणि प्रशासनावरील विश्वास हे दोन्ही टिकून राहतील.

## परतूर शहरातील पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करा; नागरिकांना वेठीस धरणे खपवून घेतले जाणार नाही - आमदार बबनराव लोणीकर

**परतुर - प्रतिनिधी**

परतूर शहरातील पिण्याच्या पाण्याची मुख्य पाइपलाइन फुटल्यामुळे तसेच मोटार जळाल्याने गेल्या दहा दिवसांपासून शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. याबाबत गंभीर दखल घेत आमदार बबनराव लोणीकर यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी इंगोले यांना कडक शब्दांत सूचना दिल्या.

पाइपलाइनचे लिकेज तातडीने पुढील दोन दिवसांत दुरुस्त करावे, नवीन मोटार बसवून पाणीपुरवठा सुरू करण्याची सर्व कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत आणि जास्तीत जास्त चार दिवसांत शहरातील पाणीपुरवठा नियमित सुरू झाला पाहिजे, असे निर्देश आमदार लोणीकर यांनी दिले.

नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दहा-दहा दिवस प्रतीक्षा करावी लागणे अत्यंत गंभीर बाब असून, यापुढे अशा प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करून भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा स्पष्ट शब्दांत आमदार बबनराव लोणीकर यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी इंगोले यांना सूचना दिल्या.

# मराठवाड्याच्या रेल्वे विकासासाठी खासदार डॉ. कल्याण काळे यांची ठाम भूमिका; प्रलंबित कामांबाबत रेल्वे प्रशासनाला मागितले स्पष्ट उत्तर

**जालना - प्रतिनिधी**

दक्षिण मध्य रेल्वेचे महाप्रबंधक, रेल निलयम, सिकंदराबाद यांच्या समवेत नांदेड येथे विभागीय रेल्वे व्यवस्थापकांच्या कार्यक्षेत्रातील खासदारांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. रेल्वे सेवा, प्रवासी सुविधा, प्रलंबित रेल्वे प्रकल्प, नवीन रेल्वे मार्ग, स्थानकांचा विकास, मालवाहतूक व्यवस्था तसेच विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी आयोजित या बैठकीत जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी मराठवाड्याशी संबंधित तब्बल १८ महत्त्वाचे विषय ठामपणे उपस्थित करत रेल्वे प्रशासनाकडून प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर आणि तथ्याधारित स्पष्टीकरणाची मागणी केली.

बैठकीत रेल्वे प्रशासनाने अनेक मागण्यांवर "Not Feasible", "Proposal Sent", "Under Consideration", "Policy Matter' किंवा "Railway Board Matter" अशी उत्तरे सादर केली. यावर खासदार डॉ. काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे कोणत्या आधारावर हे निष्कर्ष काढण्यात आले, याबाबत सविस्तर माहिती मागितली. तांत्रिक व्यवहार्यता अहवाल, प्रवासी संख्या, महसूल, प्रकल्पांची सद्यस्थिती, कालमर्यादा, निधी, जमीन संपादन, पर्यायी उपाययोजना आणि संबंधित पत्रव्यवहाराची माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

डॉ. काळे यांनी जालनाछपरा विशेष रेल्वे सेवा तात्काळ पूर्ववत सुरू करणे, पूर्णापटना रेल्वेचा विस्तार छत्रपती संभाजीनगरपर्यंत करणे, मराठवाड्यासाठी अधिक उन्हाळी विशेष रेल्वेगाड्या सुरू करणे, अजंता एक्सप्रेसचा मुंबईपर्यंत विस्तार, जालनानगरसोल



सेवेचा विस्तार, जालनाछत्रपती संभाजीनगर लोकल सेवा सुरू करणे आणि वंदे भारत एक्सप्रेस पुन्हा जालना येथून सुरू करण्याच्या मागण्या प्राधान्याने मांडल्या.

याचबरोबर मनमाड, छत्रपती संभाजीनगर दुहेरीकरण, जळगाव, अजिंठा, सिल्लोड, भोकरदन, जालना रेल्वेमार्ग, जळगाव अजिंठा वेरूळ छत्रपती संभाजीनगर पैठण अहिल्यानगरपुणे रेल्वे कॉरिडॉर, जालनाखामगाव रेल्वेमार्ग यांसह सर्व प्रलंबित प्रकल्पांची सद्यस्थिती, निधी, कामाची टक्केवारी आणि पूर्णत्वाची निश्चित कालमर्यादा जाहीर करण्याची मागणीही त्यांनी केली.

जालना, छत्रपती संभाजीनगर, मुकुंदवाडी, बदनापूर, करमाड आदी स्थानकांवरील प्रवासी सुविधांबाबतही त्यांनी सविस्तर चर्चा केली. बंद असलेल्या लिफ्ट, कोच डिस्प्ले प्रणाली, प्रतीक्षालयांची अपुरी क्षमता, दिव्यांग सुविधा, स्वच्छता, पार्किंग आणि इतर मूलभूत सुविधांबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून स्पष्ट भूमिका मागितली. जालना रेल्वे स्थानकाच्या अमृत भारत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत, मंजूर निधीपैकी किती खर्च झाला, उर्वरित कामे कधी पूर्ण होणार, याची माहिती मागविली. बदनापूर येथे प्रमुख एक्सप्रेस गाड्यांना थांबा देणे, नवीन रेल्वे सेवा सुरू करणे, जालना परिसरातील स्वतंत्र मालवाहतूक व्यवस्था, ड्राय पोर्ट, पर्यायी मालवाहतूक मार्ग, रेल्वे उड्डाणपूल व भुयारी मार्ग, तसेच अपघातप्रवण रेल्वे फाटकांवरील सुरक्षाविषयक कामांबाबतही डॉ. काळे यांनी ठोस भूमिका मांडली. ज्या प्रस्तावांना '' '' असे नमूद करण्यात आले आहे, त्यामागील तांत्रिक कारणे, अभ्यास अहवाल आणि संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची त्यांनी मागणी केली.

रेल्वे भाडे सवलती, जुने जालना गांधी चमन येथील रेल्वे आरक्षण केंद्र, नांदेड विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाच्या प्रशासकीय कार्यपद्धती आणि पूर्वीच्या पत्रव्यवहारावरील कार्यवाही अहवाल या विषयांवरही त्यांनी प्रशासनाकडे सविस्तर माहिती मागितली. जनप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या विषयांवर केवळ औपचारिक उत्तरे न देता, वेळबद्ध कृती आराखडा आणि वस्तुनिष्ठ माहिती देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीच्या शेवटी डॉ. कल्याण काळे यांनी मराठवाड्याच्या रेल्वे विकासाचा प्रश्न हा केवळ वाहतुकीचा विषय नसून उद्योग, व्यापार, शिक्षण, रोजगार, पर्यटन आणि सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असल्याचे नमूद केले. त्यामुळे प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन वेळबद्ध अंमलबजावणी करावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. मराठवाड्याच्या रेल्वे विकासासाठी आणि जालना लोकसभा मतदारसंघातील जनतेच्या दीर्घकालीन मागण्यांसाठी आपला पाठपुरावा यापुढेही अधिक जोमाने सुरू राहील,

## पावसाच्या पार्श्वभूमीवर...

ही परिस्थिती लक्षात घेता नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात असलेल्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेण्यात यावी. बंद होऊ शकणारे रस्ते, दरडी कोसळण्याची ठिकाणी अशा सर्वंकष बाबींचा विचार करून पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे. पुढील काही दिवस त्र्यंबकेश्वर परिसरामध्ये पर्यटकांनी जावू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

सर्व यंत्रणांनी अत्यंत सतर्क राहून अडकलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी तात्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. पुढील ४८ तास 'शून्य बळी' हे उद्दिष्ट ठेवून कमाल दक्षता बाळगावी, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुंबई शहरात एका महिन्याच्या सरासरी इतका पाऊस अवघ्या चार दिवसांत नोंदवण्यात आला आहे. विशेषतः भरतीच्या काळात अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर आपत्तीजन्य स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. यंत्रणांच्या प्रयत्नांमुळे पाणी साचण्याची समस्या मोठ्या प्रमाणात नियंत्रित ठेवण्यात यश आले आहे. काल मुंबई शहरात ताशी ५० किलोमीटर वेगाने वारे वाहताना निदर्शनास आले. यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. साधारणपणे संपूर्ण चार महिन्यांच्या मान्सूनमध्ये जितकी झाडे पडतात, त्यापैकी जवळपास ३०० झाडे एकाच दिवशी पडली आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

येत्या तीन दिवसांत, म्हणजे ८ जुलैच्या रात्रीपर्यंत, हवामानाची तीव्रता कायम राहण्याचा अंदाज आहे. सर्व जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे. दरम्यान, भूस्खलनाच्या घटनाही समोर आल्या आहेत. मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरही मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात माती व दगड रस्त्यावर आले आहेत. संबंधित यंत्रणा मार्ग मोकळा करून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम कराव, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

अशा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी 'वर्क फ्रॉम होम'चा अवलंब करावा. खाजगी आस्थापनांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून कर्मचाऱ्यांना वर फ्रॉम होम जे सवलत द्यावी असे न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला. बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे विभागीय आयुक्त यांच्याकडून संबंधित विभागाचा आढावा घेतला. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, बृहन्मबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, प्रधान सचिव (नगरविकास) के. एच. गोविंदराज, प्रधान सचिव (जलसंपदा) एकनाथ डवले,मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सचिव (आरोग्य) ई. रविंद्रन, संचालक श्री. चव्हाण आदी उपस्थित होते

## मनातील भीती...

येथे बोलताना केले.

रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या नूतन कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा रविवार, दि. ५ जुलै रोजी सायंकाळी हॉटेल सॅफ्रनमध्ये अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाला. त्याप्रसंगी प्रमुख अतिथी व वक्ते म्हणून म्हणून डॉ. कासट बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे मध्ये रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल प्रतीक नानावटी यांची उपस्थिती होती. प्रारंभी नूतन अध्यक्ष मधुलता भक्कड यांनी मावळत्या अध्यक्ष डॉ. प्रतिभा श्रीपत यांच्याकडून तर नूतन सचिव डॉ. अतुल जिंतूरकर यांनी मावळते सचिव पंकज लड्डा यांच्याकडून पदभार स्वीकारला.

डॉ. कासट यांनी मानवी मनातील भीती, तिचे दुष्परिणाम आणि तिच्यावर विजय मिळवण्याची गरज यावर अत्यंत सखोल व अभ्यासपूर्ण भाष्य केले. ते म्हणाले की, माणसाचे जीवन हे त्याच्या मनातील भीतीनुसार संकुचित होते. तुम्ही तुमच्या मनातून जितकी भीती बाहेर काढून टाकाल, तितके तुमचे जीवन आणि त्यातील शक्यता विस्तारत जातील. जेव्हा आपण नवीन किंवा मोठ्या आव्हानांना घाबरतो, तेव्हा आपण स्वतःभोवती एक मर्यादा आखून घेतो. अनेकांना आपल्यातील क्षमतांवर विश्वास नसतो आणि त्यामुळे मनात भीती घर करते. यावर उपाय सांगताना डॉ. कासट म्हणाले की, प्रत्येकामध्ये किमान ३२ अंगभूत क्षमता किंवा गुण असतात. तुम्ही कधीतरी शांत बसून स्वतःच्या क्षमता लिहून काढायला सुरुवात करा. सुरुवातीला ६ ते ७ गुण लिहिल्यावर तुमचा पेन थांबेल, पण येणाऱ्या काही दिवसांत जर तुम्ही सतत विचार करत राहिलात, तर तुम्हाला स्वतःमधील एकापाठोपाठ एक अनेक गुण आठवतील आणि ३२ क्षमतांची ही यादी नक्की पूर्ण होईल. ज्या दिवशी तुम्हाला हा साक्षात्कार होईल की तुमच्यामध्ये ३२ क्षमता ठासून भरलेल्या आहेत, त्या दिवशी तुमच्या मनातील सर्व भीती कायमची निघून जाईल. मग तुम्हाला कोणत्याही बाह्य मोटिव्हेशनल (प्रेरणादायी) भाषणाची किंवा मार्गदर्शनाची गरज उरणार नाही.

प्रास्ताविकपर भाषणात नूतन अध्यक्ष मधुलता भक्कड म्हणाल्या की, रोटरीचे या वर्षाचे घोषवाक्य क्रिएट अ लास्टिंग इम्पॅक्ट हे आपल्याला समाजात कायमस्वरूपी प्रभाव पाडणारे कार्य करण्यासाठी प्रेरित करते. या वर्षात शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण (आदिशक्ती प्रकल्प), युवा विकास आणि पर्यावरण संवर्धनावर विशेष भर दिला जाईल. एज्युफेस्ट एक्सेल, साडी वॉकेथॉन आणि मिसेस आरोग्यवती यांसारखे प्रकल्प राबवून क्लबची सेवाकार्य घोडदौड सुरूच ठेवली जाईल, असा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

मावळत्या अध्यक्ष डॉ. प्रतिभा श्रीपत यांनी आपल्या कार्यकाळातील विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेत, सर्व सदस्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व नूतन टीमला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

डॉ. अतुल जिंतूरकर यांनी रोटरीच्या सेवाकार्याला अधिक गती देण्याचा विश्वास दिला. याप्रसंगी किडनी दात्या वैशाली देशपांडे, रूपाली पवार यांचा आणि क्लबचे नूतन सदस्य सीमा पंढरीनाथ मांटे, शंकर ओसाराम मुंदडा, संजय भिकाजी नागरे, तृप्ती प्रसन्ना कोठारी, डॉ. सतीश लालचंद मुंदडा यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती भक्कड आणि नेहा पाटणी यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. अतुल जिंतूरकर यांनी मानले. या सोहळ्याला रोटरी परिवारातील पदाधिकारी, सदस्य आणि शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्त्याच्या मागणीसाठी...

लावून धरून लवकरात लवकर रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

आंदोलनाची दखल.

आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये साचलेले पाणी जेसीबीच्या सहाय्याने काढण्यास सुरुवात केली आहे. तसेच, या खड्ड्यांमध्ये मुरूम टाकून रस्ता तात्पुरता वाहतुकीयोग्य करण्याचे काम तातडीने हाती घेतले जाईल, असे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले आहे.

आम्ही या परिसरात आल्यानंतर नगर परिषदेची महानगर पालिका झाली. त्याचबरोबर शहराच्या अनेक भागात नळ, पाणी, लाईटची व्यवस्था झाली परंतु आम्ही राहत असलेल्या परिसरात महानगरपालिकेने ना रस्ता दिला ना पाणी दिले. त्यामुळे आम्ही शहरात राहतो की एखाद्या खेड्यात असा प्रश्न आम्हाला पडला आहे. महानगरपालिकेने रस्त्याचा प्रश्न न सोडविल्यास लवकरच परिसरातील सर्व नागरिकांना घेऊन महानगरपालिकेच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल.

**–अमोल वायाळ,**
**रहिवाशी मयुरी पार्क**

आमचा संपूर्ण परिसरातील नागरिकांकडून महानगरपालिका कर आकारणी करते मात्र येथील रहिवाशांना जाण्या–येण्यासाठी रस्ता देखील उपलब्ध करुन देवू शकत नाही. शहराच्या १० किमी अंतरावर असलेल्या विविध कॉलन्यामध्ये रस्त्याबरोबर पाण्याची सोय केलेली आहे. मात्र आमच्या परिसरात रस्ता नाही, पाणी नाही आणि विजेची देखील अत्यंत वाईट अवस्था आहे. महापालिकेने दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करु.

**– कैलास धुमाळ,**
**रहिवाशी मयुरी पार्क**

पावसाळ्याचे दिवस असल्याने शाळकरी मुलांना शाळेत सोडणे, आणणे या रस्त्यावरुन अत्यंत जिकरीचे होत आहे. खड्डेमय रस्त्यावर चिखल झाल्याने महिला दुचाकीवरुन पडण्याचे प्रमाणही अधिक झाले आहे. रस्ता, वीज, पाणी या बाबीतरी महानगरपालिकेने पुरविणे गरजेचे आहे. दिवसेंदिवस लोकांचा उद्रेक वाढत आहे. रस्त्याचा प्रश्न मार्गी न लागल्यास पुढील काळात महिलांना सोबत घेऊन महानगरपालिकेच्या दालनात बसणार आहे.

**ॲड. अंकिता बाहेती,**
**ृष्णबन सोसायटी**

## संत साहित्यात...

झाल्या आहेत. असे सांगून अंबेकरांनी संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील वेगवेगळ्या तत्वज्ञानाचा आजही कशी गरज आहे हे सांगितले. त्यात वृक्षवल्ली आम्हा सोयरी तसेच नगरे कुठे वसवावीत यासह मैत्र दिनाचे महत्त्व हे त्यांनी त्या काळात सांगितल्याचे आवर्जुन उल्लेख केला.

शेगावात जन्मल्यामुळेच संत गजानन महाराजांशी अतुट नाते

पवित्र अशा शेगाव नगरीमध्ये जन्म आणि बालपण गेल्यामुळे आपल्यावर संत गजानन महाराजांचा पगडा होता. तो आजही कायम असून जीवनात अनेक संकट आली. परंतु संत गजानन महाराजांच्या नामस्मरणाने ती टळत गेली. आज मोठ्या समाधानाने जगत असून आपल्या हातून काहीतरी चांगले व्हावे या हेतूने दर बुधवारी भक्ती गीत रचून ते गजानन महाराज भक्तांच्या ग्रुपवर शेअर करत गेले. त्यातूनच २१ भक्ती गीते तयार झाली. आपली हे गीतं लोकांनाही आवडू लागली. त्यामुळे शैलेंद्र टिकारिया आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा अल्बम काढण्याचा निर्णय घेतला. यासाठी रमेश देहेडकर व एकूणच आमच्या परिवाराची मोठी साथ मिळाल्यानेच हे शक्य झाल्याचे रसना देहेडकर यांनी नमूद केले.

## राहाशे किमी सायकलिंग...

समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेत सहभागी झालेले जालन्याचे आयर्नमॅन कैलास झोळगे यांची सायकल येरमाळा येथे नेमकी सायकल पंक्चर झाली. त्यात झोळगे यांचा दोन तासांचा वेळ वाया गेला. मात्र, जिद्दीच्या बळावर त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही हवामान, खड्डे, पाऊस, आद्रता, चढ – उताराचा आणि दुसरीकडे वेळेचे कडक बंधन अशा आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करत दोन तासांचा वेळ वाया जाऊनही जिद्द आणि अफाट सहनशक्तीच्या बळावर सदर ६०० किलोमिटरचे अंतर वेळेच्या आत पूर्ण करून कैलास झोळगे यांनी अव्वल स्थान मिळवत जालन्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

## टेंभुर्णीच्या डॉक्टर...

दर्शन घेऊन वारीची सांगता होणार आहे.

या वारीचे अध्यक्ष डॉ. पंडित सुरशे, उपाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर थोरात, सचिव लक्ष्मण सुरडकर आणि वारी प्रमुख डॉ. राहुल चौधरी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण नियोजन पूर्ण झाले असून, सहभागी सायकलिस्ट वारकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. ''फिट राहूया, सायकल चालवूया आणि विठ्ठल भक्तीचा संदेश घराघरात पोहोचवूया'' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेली ही सायकल वारी मराठवाड्यातील फिटनेस आणि भक्तीचा एक प्रेरणादायी उपक्रम म्हणून ओळख निर्माण करत आहे.

## गटई कामगारांना...

योजनेचा लाभघ्यावा असे आवाहन डॉ. अनिता राठोड, सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## ग्रामपंचायत...

अदा करण्याची हमी देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात आजही संगणकपरिचालकांना नियमित मानधन मिळत नसल्याने प्रत्येक वेळी निवेदने व आंदोलने करावी लागत आहेत.

राज्यातील संगणकपरिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा, किमान वेतन तसेच किमान १० हजार रुपयांचे मानधन प्रत्येक महिन्याला निश्चित तारखेला देण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करावी, अशी मागणी संघटनेने आमदार बबनराव लोणीकर यांच्यामार्फत राज्य शासनाकडे केली आहे.

या प्रसंगी अशोक चव्हाण, विष्णू ढोबळे, प्रल्हाद गोरे, केशव लहाडे, मारोती घोरबंड, नारायण सोळंके, राम सुपेकर, भरत कव्हळे, रामेश्वर मुरकुटे, दिपक खवणे, मोहन राठोड, किरतेस वाडकर यांच्या सह शेकडो ग्रामपंचायत चे संगणक चालक उपस्थित होते.

## दोन शस्त्रक्रिया...

संरक्षण कायद्याच्या कक्षेत येतात. सेवेमध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी किंवा निष्काळजीपणा आढळल्यास ग्राहकांना दाद मागण्याचा पूर्ण अधिकार आहे. अनेकदा नागरिक मोठ्या रुग्णालयांच्या आणि डॉक्टरांच्या नावापुढे दबून जातात आणि कायदेशीर लढाई टाळतात, परंतु या निकालाने हे सिद्ध केले आहे की कायद्यापुढे सर्व समान आहेत.''

ॲड. धन्नावत यांनी पुढे ग्राहकांना आवाहन करताना म्हटले की, ''रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी उपचारादरम्यान अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे. रुग्णालयातून डिस्चार्ज घेताना डिस्चार्ज सारांश , ऑपरेशनच्या तपशीलवार नोट्स, एक्स–रे, अल्ट्रासाऊंडचे रिपोर्ट आणि सर्व बिलं जपून ठेवावीत. या प्रकरणात ऑपरेशन नोट्स नसल्यामुळे रुग्णालयाची बाजू लंगडी पडली. जर तुम्हाला उपचारात काही त्रुटी आढळल्यास किंवा डॉक्टरांकडून योग्य वागणूक न मिळाल्यास, त्वरित कायदेशीर सल्ला घ्या आणि ग्राहक आयोगाकडे तक्रार करण्यास अजिबात संकोच करू नका. तुमचा हक्क मिळवण्यासाठी जागरूक राहणे ही काळाची गरज आहे.''

राज्य आयोगाने रुग्णालयाचा युक्तिवाद फेटाळून लावला, ज्यात त्यांनी म्हटले होते की स्टोन पुन्हा तयार होणे ही एक सामान्य बाब आहे. आयोगाने तज्ञ समितीच्या मताला महत्त्व दिले, ज्यात म्हटले होते की इतक्या कमी कालावधीत एवढा मोठा स्टोन पुन्हा तयार होणे शक्य नाही. तसेच, रुग्णालयाने सादर केलेल्या एक्स–रे रिपोर्टमधील रुग्णाच्या नावात तफावत असल्याचेही आयोगाच्या निदर्शनास आले. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्टिन एफ. डिसोझा विरुद्ध मोहम्मद इफ्शाक या खटल्याचा संदर्भ देत आयोगाने स्पष्ट केले की वैद्यकीय निष्काळजीपणाच्या प्रकरणांमध्ये तज्ञ वैद्यकीय मत अत्यंत महत्त्वाचे असते आणि या प्रकरणात रुग्णालयाला तज्ञ मताचे खंडन करता आलेले नाही.

# शेतकऱ्यांना नापिकी आणि कर्ज या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी योजना

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६

राज्यातील शेतक-यांना निसर्गाचा लहरीपणा सांभाळत शेती करावी लागते आणि त्या शेतीसाठी मेहनत घेऊनही अनेकदा अतिवृष्टी दुष्काळ यामुळे पिकांचे नुकसान होत असते. पीक आले नाही तर उत्पन्न नाही आणि परिणामी शेतीसाठी बँकेकडून घेतलेले कर्ज फेडणे शक्य होत नाही. या मुळे शेतकरी वर्ग सतत चिंतेत असतो. शेतकरी वर्गास नापिकी आणि कर्ज थकणे या दुष्टचक्रात अडकून पडावे लागते. शेतकरी वर्गास प्राधान्य देणाऱ्या सरकारने यासाठीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना २०२६ ही जाहिर केली आहे. या रूपाने ही आजवरची सर्वात मोठी आणि राज्यातील ५८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ देणारी महाकर्जमुक्ती ठरली आहे.

शेतकरी बांधवांना २ लाख रुपयांपर्यंत असणारे कर्ज माफ होणार आहे. ज्यांचे कर्ज २ लाखांपेक्षा अधिक आहे अशा शेतकऱ्यांनी २ लाख रुपयांपेक्षा जादा असलेला थकीत कर्जाची रक्कम भरल्यानंतर त्यांनाही याचा लाभ मिळणार आहे. आणि जे शेतकरी कर्ज घेऊन त्याची नियमित परतफेड करतात अशा शेतकऱ्यांचाही विचार या योजनेत झाला आहे. नियमित कर्जाचे हप्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम या कर्जमुक्ती मोहिमेत दिली जाणार आहे.

शासन स्तरावर शेतकरी वर्गास प्राधान्य देण्याची जी भूमिका आहे त्याचाच एक भाग म्हणून याकडे आपणास बघता येईल. शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतानाच पिकाचा विमा घेण्याचा सल्ला दिला जातो आणि त्यांच्या पिकाचा विमा देखील काढला जातो. ही योजना प्रधानमंत्री फसल विमा म्हणून सर्वांना परिचित आहे. या अंतर्गत वेळोवेळी पिकाचे नुकसान आलेल्या शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी भरपाई दिलेली आहे.

बीड जिल्हा हा मुख्यत्वे शेतीवर आणि अनुषंगिक व्यवसायांवर आधारित आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत शेतकऱ्यांना २ लाखांची कर्ज माफ योजना लाभाचीच ठरणार आहे.

मात्र यापूर्वीही शासनाने आपली लक्ष्यात घेऊन वेळोवेळी शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती शेतीपीक अनुदान वाटप केलेले आहे. याचाही नोंद यावेळी घेतली पाहिजे

जिल्ह्यात २०२५-२६ च्या खरिप हंगामात अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टी या दोन्हीमुळे जिल्ह्यात शेतीपिकाचे नुकसान झाले होते. त्यासाठी शासनाने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना १४५८ कोटी रुपयांहून अधिक रक्कम देऊ केली सोबतच याचवर्षी रब्बी हंगामात पेरणीसाठी अनुदान म्हणून ६५० कोटी रुपये अनुदान दिले.

सोबतच पिक विमा भरपाई वेगळी आहे आणि त्यानंतर आता या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी २०२६ याअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्यास २ लाख रुपये कर्जमाफी देखील दिली आहे.

शेतकरी हा मुख्य घटक मानुन शेतकरी हित केंद्रीत या सर्व भूमिकेमुळे शासन शेतकऱ्याला नापिकी आणि कर्ज या दुष्टचक्रातून मुक्त करण्यास कटिबद्ध आहे याचीच खात्री शेतकऱ्यांना दिली आहे.

**प्रशांत दैठणकर**
**उपसंचालक (माहिती)**
**विमाका छत्रपती संभाजीनगर**
**९८२३१९९४६६**

## सन्मित्र कॉलनी प्रभाग क्र. ६ मध्ये मतदार नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर शहरातील सन्मित्र कॉलनी, प्रभाग क्रमांक ६ अंतर्गत बुथ क्रमांक २३७, २३८ व २३९ येथील मतदारांचे प्रत्यक्ष अर्ज (फॉर्म) भरून घेण्याच्या अभियानास आजपासून सुरुवात करण्यात आली. या उपक्रमात मतदारांना आवश्यक मार्गदर्शन करून त्यांचे अर्ज अचूकपणे भरून घेण्यात आले.

या अभियानात कैलासराव गाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक प्रकाश भाऊ चव्हाण यांच्या उपस्थितीत आणि बुथ प्रमुख प्रमोद पिसाळ यांच्या समन्वयातून काम पार पडले. यावेळी मुरलीधर सोनखेडकर, दीपक मोरे, प्रदीप हरणे, सुनील काळे, उद्धव शेंडगे, प्रमोद राठोड, अमोल पैठणकर, राजू मोरे, राम जईद व सुनील खरात यांनी सक्रिय सहभाग घेत मतदारांचे फॉर्म भरून घेण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमामुळे प्रभागातील नागरिकांना मतदार नोंदणीची प्रक्रिया सुलभ झाली असून, आगामी काळातही उर्वरित पात्र मतदारांचे अर्ज भरून घेण्याचे अभियान सुरू राहणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

## सिद्धिविनायक मंदिर येथे 'सर्वंभ' फाऊंडेशन आरोग्य शिबीर संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

''सर्वंभ'' फाऊंडेशन महाराष्ट्र राज्यात होमिओपॅथी डॉक्टर समूहाच्या सहयोगाने सिद्धिविनायक मंदिर,प्रभादेवी येथे मोफत आरोग्य शिबिर आयोजित केले होते,जॉर्डड पाऊस असूनही असंख्य श्री गणेश भक्तांची आरोग्य शिबिरास उपस्थिती होती. या आरोग्य शिबिरात सेवेसाठी ५० होमिओपॅथी डॉक्टरांची उपस्थिती लाभली होती.




आरोग्य शिबिर आयोजनासाठी अमूल्य सहकार्य सिद्धिविनायक मंदिर न्यास अध्यक्ष आ.सदा सरवणकर यांचे लाभले होते. आरोग्य शिबिराच्या उद्धाटनासाठी मंदिर कोषाध्यक्ष पवन आचार्य त्रिपाठी व युवा पत्रकार श्री.गजानन जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती,या मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन ''सर्वंभ'' फाऊंडेशन अध्यक्ष डॉ.वैशाली भिडे यांनी केले होते.

## जाफ्राबाद तालुका जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ससाने

### उपाध्यक्षपदी दिलीप खंदारे तर सचिवपदी प्रदीप जाधव यांची निवड; विविध उपक्रमांचे होणार आयोजन



**दत्ता देशमुख**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त जाफ्राबाद तालुकास्तरीय जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी सुनील ससाने, उपाध्यक्षपदी दिलीप खंदारे, तर सचिवपदी प्रदीप जाधव यांची निवड करण्यात आली आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आणि जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते एकत्रितपणे काम करणार आहेत. समितीच्या वतीने जयंतीनिमित्त गावागावांत प्रभातफेरी, व्याख्यान, साहित्य संमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी दिली. या नव्याने स्थापन झालेल्या समितीचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचे ज्ञानेश्वर पवार, अनिल ससाणे, गजानन ससाणे, ईसुब सौदागर, दिपक जाधव आदींनी अभिनंदन केले आहे.

## गोपाळपुरा येथील असंख्य युवकांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश - आ.खोतकरानी केले सर्वांचे स्वागत

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील प्रभाग क्र. ७, गोपालपुरा येथील असंख्य युवकांनी दिनांक ५ जुलै २०२६ रोजी शिवसेना उपनेते आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. हा छोटेखानी प्रवेश सोहळा दर्शना बंगल्यावर पार पडला असुन यावेळी युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कमलेश खरे (विरोधी पक्षनेते, मनपा), शिवा पहलवान शेळके (ज्येष्ठ



शिवसैनिक), या नगरसेवक नरेश खुदभैय्ये यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या युवकांमध्ये सिद्धेश चव्हाण (ओम), सागर सातपुते, कृष्णा इंगले, गजानन सातपुते, आर्यन गाजरा, दुर्गेश गुर्वे, चेतन आडेकर, ओम पोलास, कृष्णा खर्डेकर, सोमेश सातपुते, गौरव सातपुते, मयुर वाडेकर, अभिषेक कुपटकर, ओम शेडके आणि राम प्रजापत यांचा समावेश होता. यावेळी नव्याने प्रवेश केलेल्या युवकांचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी स्वागत करत पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले. युवकांच्या या मोठ्या प्रवेशामुळे प्रभाग क्र. ७ मध्ये शिवसेनेची ताकद आणखी वाढल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## ऍड पुष्पक काबरा यांच्या ऑफिस ला महेश गिरी महाराज यांची सदिच्छा भेट

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी जाफ्राबाद रोड वरील गौरी आश्रम मठाचे मठाधीपती आदरणीय महेश महाराज यांनी टेंभुर्णी येथील प्रसिद्ध वकील पुष्पक काबरा यांच्या संभाजीनगर येथील ऑफिस ला भेट देऊन त्यांना शुभेच्छा आणि आशीर्वाद दिला.

श्री राष्ट्रसंत जनार्दन स्वामींच्या परम भक्त स्वामी महेशगिरीजी महाराज, यांच्या सह गोपेश्वर महादेव मंदिर, सोनगिरीचे राघवगिरिजी महाराज, जनेश्वर महादेव मंदिर, जवखेड्याचे ज्ञानेश्वर माऊली महाराज.हे सुद्धा या वेळी सोबत होते.छत्रपती संभाजीनगर येथील ॲड. पुष्पक



संतोष काबराच्या ऑफिसला त्यांच्या टेंभुर्णी चे संतोष शेठ काबरा, पिंपळे गुरूजी, रघुराम उखर्डे, शिवाजी महाराज वरगणे व इतर शिष्यसांप्रदाय उपस्थित होते.

## स्वर्गीय बाबा शिंगोटे यांचे वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - प्रतिनिधी**

स्वर्गीय मुरलीधर उपाख्य बाबा शिंगोटे सामान्य कुटुंबातून मेहनतीच्या जोरावर मोठा व्यवसाय उभारला. वृत्तपत्र विक्रीपासून ते अग्रणी वृत्तपत्र समूहाचे संस्थापक हा त्यांचा प्रवास थक्क करणार आहे बाबा शिंगोटे यांनी नेहमी वृत्तपत्राच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न सोडवत समाजसेवेचे कार्य केल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे काढले. लालबाग येथील नारायण उद्योग भवन जवळील चौकाचे 'मुरलीधर उपाख्य बाबा शिंगोटे' असे नामकरण करण्यात आले. या नवीन चौक नामफलकाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, महापौर रितू तावडे, पुण्यनगरी समूहाचे संचालक अरविंद शिंगोटे, प्रवीण शिंगोटे, भावेश शिंगोटे, प्रतीक शिंगोटे, राजकीय संपादक उदय तानपाठक, संपादक शैलेंद्र शिर्के आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बाबा शिंगोटे यांनी वृत्तपत्र सृष्टीत मोठे विश्व निर्माण केले आहे. त्यांची दुसरी व तिसरी पिढी आपल्याला काम करताना या ठिकाणी पाहायला मिळत आहे.

व्यवसाय कितीही मोठा झाला असला, तरी बाबा शिंगोटे नेहमी आपले साधेपणाला धरून राहिले. कधीही मोठेपणा दाखवला नाही. हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या चौकाच्या नामकरणातून अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाची नेहमी आठवण आपल्या मनात कायम राहील.

# राज्यातील शिक्षकांना मतदार याद्या सखोल पुनर्निरिक्षण (एसआयआर) काम; शाळा आणि विद्यार्थी वाऱ्यावर!

## एसआयआर च्या कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे! मराठवाडा शिक्षक संघाचे निवेदन

**दत्ता देशमुख**

दिनांक ०७/०७/२०२६ महाराष्ट्रात मतदार याद्या सखोल पुनर्निरिक्षण (एसआयआर) कार्यक्रम सुरू आहे. त्याकामासाठी मतदान केंद्र स्तरीय अधिकारी म्हणून शिक्षकांच्या नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. शिक्षक त्याकामात व्यस्त असल्याने शाळा आणि विद्यार्थी वाऱ्यावर सोडण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा हा निर्णय असल्याने पालक व विद्यार्थी वर्गात प्रचंड असंतोष व चिड निर्माण झाली आहे. याची दखल घेऊन एसआयआरच्या कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री आणि शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राजकुमार कदम यांनी पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शैक्षणिक वर्षाची नुकतीच सुरुवात झालेली आहे. मुलं शाळेत येत आहेत. आगोदरच शिक्षक संख्या पुरेशी नसल्याने जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगर पालिका व खाजगी अनुदानित शाळेसमोर अनंत अडचणी आहेत. अशा परिस्थितीत बहुतांश शिक्षकांना निवडणूक विभागाने मतदान केंद्र स्तरीय अधिकारी म्हणून नियुक्तीचे आदेश दिले आहेत.

कामाचे स्वरूप पहाता हे काम पूर्ण वेळ केले तरी निर्धारित तीन महिन्यांत शिक्षकांची दमछाक होणार आहे. एवढा प्रदीर्घ कालावधीत राज्यातील अध्यापन प्रक्रिया कोलमडून पडणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होणार आहे. शाळेत शिकविण्यास प्रथम प्राधान्य देणाऱ्या शिक्षकांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत, ही अतिशय संतापजनक बाब आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की,मा. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या निकालानुसार शिक्षकांना सुटीच्या काळात करता येईल एवढेच काम देण्याचे आदेशित करण्यात आले आहे तद्वतच शिक्षण हक्क कायदा (आरटीई),२००९ नुसार शिक्षकांचे मुख्य कर्तव्य केवळ अध्यापन करणे हेच आहे. जिल्हा परिषद व खाजगी अनुदानित शाळेतील बहुतांश शिक्षक एसआयआर कामासाठी नियुक्त करण्यात आले आहेत. परिणामी शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीलाच अध्ययन अध्यापन प्रक्रिया ढेपाळली आहे. अनेक शाळा बंद असल्यासारख्याच आहेत. त्यामुळे विद्यार्थी व पालकांमधे प्रचंड असंतोष व चिड निर्माण झाली आहे. याची दखल घेऊन मतदार याद्या सखोल पुनर्निरिक्षण कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, व्ही.जी.पवार,अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव,सरचिटणीस राजकुमार कदम,कोषाध्यक्ष औताडे ए. बी. उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे, प्राध्यापक डॉक्टर मारुती तेदमपुरे, प्रेमदास राठोड, आरेफ कुरेशी, जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, जिल्हा सचिव संजय येळवंते, उपाध्यक्ष जगन वाघमोडे, भीमा शिंदे, दीपक शेरे , कोषाध्यक्ष नारायण मुंडे, सदस्य तुकाराम पडघन काकड सिद्धी प्रमुख भगवान धनगे, हकीम, भागवत काकडे, विष्णू इप्पर ,कैलास मांटे ,दत्तात्रय राऊत, रवींद्र भुसारे, पटेल, तालुका अध्यक्ष रमेश गाडे, गणेश मेहेत्रे, शिवाजी कायंदे, आनंदा वाघ, सुधाकर डोईफोडे, यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जालना महापालिकेच्या कारभारावर शिवसेनेचा घणाघात; शहरातील अपूर्ण कामे, अस्वच्छता व खड्ड्यांवर आयुक्तांकडे तक्रार

**जालना - प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होऊनही जालना शहरातील अपूर्ण विकासकामे, नाल्यांची अपुरी साफसफाई, रस्त्यांची दुरवस्था, अस्वच्छता, उघडे मॅनहोल, विस्कळीत पाणीपुरवठा तसेच महानगरपालिकेच्या कारभारातील कथित अनियमितता याविरोधात जालना महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते कमलेश खरे व शिवसेनेच्या नगरसेवक-नगरसेविकांनी महापालिका आयुक्तांकडे सविस्तर निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, पावसाळ्यापूर्वी शहरातील सर्व नाल्यांची साफसफाई पूर्ण झाल्याचा दावा महापालिका प्रशासन व सत्ताधाऱ्यांकडून करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात शहरातील अनेक मोठे व लहान नाले अजूनही गाळ, प्लास्टिक आणि कचऱ्याने भरलेले असून अनेक भागांत पावसाचे पाणी तुंबत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका वाढल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पालिकेने नालेसफाई व इतर कामांवर कोट्यवधी रुपये खर्च झाल्याचा दावा केला असला तरी पहिल्याच पावसात शहरातील अनेक भाग जलमय झाल्याने खर्च झालेला निधी नेमका कुठे गेला, असा सवालही निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. नागरिकांच्या कराच्या पैशाचा योग्य वापर झाला का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पावसामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून त्यामध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे रोज लहान-मोठे अपघात होत असून भविष्यात गंभीर दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. तसेच चांगल्या स्थितीतील रस्ते पाणीपुरवठा व सांडपाणी वाहिनीच्या कामांसाठी खोदण्यात आले; मात्र काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची योग्य दुरुस्ती करण्यात आली नसल्याने सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शहरातील अनेक भागांत मॅनहोलची झाकणे उघडी असल्याचे सांगत, विशेषतः पावसाळ्यात व रात्रीच्या वेळी ही परिस्थिती नागरिकांच्या जीवितासाठी धोकादायक ठरत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे सर्व उघडे मॅनहोल तातडीने बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या राजकीय कारभारावरही निवेदनातून टीका करण्यात आली आहे. चार महिने उलटूनही महापौरांनी एकही सर्वसाधारण सभा घेतली नसल्याचा आरोप करत लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्यात समन्वय नसल्यामुळे विकासकामे आणि नागरिकांचे प्रश्न रखडल्याचे नमूद करण्यात आले आहे.

स्वच्छता विभागात पात्रता नसलेल्या व्यक्तींना स्वच्छता निरीक्षक (एसआय) म्हणून राजकीय अथवा अन्य माध्यमांतून नियुक्त करण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. अपात्र अधिकाऱ्यांमुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा बोजवारा उडाला असून अशा नियुक्त्या रद्द करून पात्र उमेदवारांची पारदर्शक पद्धतीने नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेवरही विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. कोणत्या भागात कोणत्या दिवशी आणि कोणत्या वेळी पाणी येणार याचे कोणतेही निश्चित वेळापत्रक नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# संत साहित्यात जीवनाचा उद्धार करण्याची शक्ती– आनंदगडकर महाराज

## रसना देहेडकर यांच्या संत गजानन महाराज ऑडियो अल्बमचे थाटात लोकार्पण

जालनाः जीवनामध्ये संत साहित्याचे खुप मोठे महत्त्व असून संतांनी सांगितलेल्या मार्गावर चालल्यास जीवनाचा उद्धार होतो. आज रसना देहेडकर यांनी संत गजानन महाराजांच्या एकूणच कार्यावर २१ गीतांचा ऑडियो अल्बम तयार केला आहे. त्याचे चिंतन व मनन केल्यास निश्चितच लाभ असे मार्गदर्शन ह.भ.प.आनंदगडकर महाराज यांनी केले. स्वयंवर मंगल कार्यालयात रविवारी झालेल्या कार्यक्रमात आनंदगडकर महाराज बोलत होते.

रसना देहेडकर यांनी २१ भक्तीगीतांची रचना केल्यानंतर त्याचा ऑडिओ अल्बम काढण्यासाठी जालन्यातील प्रसिद्ध संगीतकार शैलेंद्र टिकारिया आणि त्यांचा मुलगा सिद्धांत टिकारिया यांनी पुढाकार घेतला. ही भक्ती गीते गाण्यासाठी जालन्यातील वेगवेगळ्या गायकांना संधी देण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती आ.अर्जुनराव खोतकर, महापौर वंदना मगरे, माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, रामदास महाराज आचार्य यांची उपस्थिती होती. याप्रसंगी रामदास महाराज आचार्य यांनी आशीर्वचनपर मार्गर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक रसना देहेडकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड.दीपक कोल्हे आणि ॲड. रोहिणी कुलकर्णी यांनी केले.या कार्यक्रमास



रेखा बैजल, शिवकुमार बैजल, माजी जिल्हा संघ चालक विनायकराव देहेडकर, एस.एन.कुलकर्णी, ॲड.सुरेश कुलकर्णी, विद्या कुलकर्णी, यशवंत बदनापूरकर, सुनंदा बदनापूरकर, विनायक महाराज फुलंब्रीकर, पंडितराव भुतेकर, अभय कुलकर्णी, राजेंद्र भोसले, एम.जी.जोशी, आर.आर.जोशी, नितीन कोळेश्वर, राम गायकवाड, रवींद्र देशपांडे, दीपक रणनवरे, भारती नाईक, कमल तुल्ले तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

**रसनाताईंचे करावे तेवढे कमीच– आ.खोतकर**

रसनाताई देहेडकर या आपल्या मोठ्या बहीण असून त्या वेळोवेळी आपल्याला कुठल्या ना कुठल्या विकास कामांच्या मुद्द्यावरून नेहमीच चर्चा करतात. आज त्यांनी संत गजानन महाराजांच्या जीवन चरित्रावर रचलेली गीते निश्चितच प्रेरणादायी ठरतील.सध्या सर्व वारकरी आणि महाराष्ट्र विठ्ठलच्या भक्तीत रमरमाण झाला आहे. हे औचित्य साधून देहेडकर यांनी हा लोकार्पण सोहळा आयोजित केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. संत विचार आणि वारकरी संप्रदाय हा आजही मानवाला तारूण नेतो आपण विचारांपासून भरकटल्याने बालगुन्हेगारीसह संस्कार लोप पावत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली.

**रसना नव्हे रचना देहेडकर– भास्कर अंबेकर**

रसना देहेडकर यांनी संत गजानन महाराजांच्या जीवन चरित्रावर भक्ती गीतांच्या माध्यमातून टाकलेला प्रकाश हा निश्चित सर्वसामान्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी २१ भक्ती गीते लिहिली आहेत. त्यामुळे त्यांचे नाव जरी रसना असले तरी आजच्या औचित्यामुळे त्या खऱ्या अर्थाने रचना देहेडकर (पान २ वर)

# सहाशे किमी सायकलिंग केवळ ३३.४७ तासात पूर्ण : आयर्नमॅन कैलास झोळगे यांचा विक्रम

## अनिरुद्ध जुंबड ठरले बी.आर. एम.किताबाचे मानकरी

जालना (प्रतिनीधी) व्हिएतनाम येथील जागतिक पातळीवर स्पर्धेत जालन्याचे नाव उंचीवर नेऊन ठेवणारे पहिले आयर्नमॅन कैलास झोळगे ६०० किलोमिटर सायकलिंग केवळ ३३.४७ तासात पूर्ण करत आणखी एका विक्रमाची नोंद आपल्या नावावर करून जालना जिल्ह्याचे नाव नावलौकिक केले आहे. दरम्यान,अनिरुद्ध जुंबड यांनीही या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत सुपर रेडओनर किताब पटकावला आहे.

फ्रान्सच्या ऑडेक्स क्लब पॅरिसियन () या जागतिक संस्थेच्या मान्यतेने दि.२६ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील फिनिक्स क्लब येथून सकाळी ५.३० वाजता बी.आर.एम.सायकल स्पर्धेला सुरुवात करण्यात आली होती. छत्रपती संभाजीनगर ते बीड – येरमाळा – तुळजापूर आणि परत छत्रपती संभाजीनगर



अशी तब्बल ६०० किलोमिटरची ही जागतिक स्तरावर अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या सायकल स्पर्धेत जालन्याचे आयर्नमॅन कैलास झोळगे यांनी चमकदार कामगिरी करत तब्बल ६०० किलोमिटरचे डोंगराएवढे अंतर हवेच्या वेगाने कापत केवळ ३३.४७ तासात पूर्ण क.

रून अव्वलस्थान पटकावले तर अनिरुद्ध जुंबड यांनी आपल्या पूर्ण शारीरिक कसोटीच्या जोरावर ३८.३० तासात यशस्वीरित्या अंतर पूर्ण केले.या यशाबद्दल बोलतांना कैलास झोळगे आणि अनिरुद्ध जुंबड म्हणाले की, या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आम्ही मागील अनेक महिन्यांपासून कसून सराव केला. शिर्डी, शेगाव, राजूर, अंबड, देऊळगाव राजा या मार्गावर भरपूर सराव करत स्पर्धेसाठी योग नियोजन केले. या सरावाचा देखील मोठा फायदा या स्पर्धेत झाल्याचे त्यांनी सांगितले.आयपीएस अधिकारी संजय बारकुंड यांचे विशेष मार्गदर्शन आम्हाला लाभले आहे. आयपीएस बारकुंड यांनीही झोळगे आणि जुंबड यांच्या यशाबद्दल कौतुक करत त्यांचे हे यश आगामी पिढीतील सायकलपटूंसाठी प्रेरणादायी ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या यशाबद्दल डॉल्फिन स्पोर्ट्स ग्रुपचे अध्यक्ष नथुमल नाथानी, अनिल मालपानी,संगाप्पा चोकनपळे, विजय लोळगे,प्रदिप चेके, राहुल लबडे,अनिल पाटील, रामेक्ष्वर गोरे,विक्रांत मोंढे, राहुल साळवे,

योगेश वानखडे, विठ्ठल गाडेकर,संदिप डोंगरे, गणेश पवार,अरूण राकडे, सिद्धिविनायक झोळगे, दिपक खांडेभराड,शरद तोटे, प्रणव किनगावकर, स्पोर्ट्स ग्रुप, क्रीडाप्रेमी, सायकल संघटना, मित्र परिवार सर्व अधिकारी आदींनी आयर्नमॅन कैलास झोळगे आणि अनिरुद्ध जुंबड यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**सायकल पंक्चर, मात्र जिद्द कायम राखत स्पर्धेत मिळवले अव्वलस्थान**

अत्यंत कठीण (पान २ वर)

# टेंभुर्णीच्या डॉक्टर पंडित सुरुसे च्या नेतृत्वात फिटनेस, भक्ती आणि पर्यावरणाचा संदेश देणारी जाफ्राबाद - पंढरपूर सायकल वारी ९ जुलैपासून

**दत्ता देशमुख**

भोकरदन-जाफ्राबाद सायकल असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेली चौथी भव्य भोकरदनपंढरपूर सायकल वारी येत्या ९ जुलैपासून सुरू होत आहे. भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यातील सायकलिस्ट वारकरी तब्बल ४०० किलोमीटरचा सायकल प्रवास करून ११ जुलै रोजी पंढरपूर येथे पोहोचणार आहेत.

ही वारी केवळ पंढरपूर दर्शनापुरती मर्यादित नसून फिटनेस, पर्यावरण संवर्धन, सामाजिक ऐक्य आणि विठ्ठल भक्तीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. सायकलिंगमुळे निरोगी जीवनशैली, इंधन बचत आणि प्रदूषणमुक्त पर्यावरणाचा संदेशही जनतेपर्यंत पोहोचविला जाणार आहे. भोकरदनजालनागेवराईबार्शीपंढरपूर असा या वारीचा मार्ग असून, संपूर्ण प्रवासात विठ्ठल नामाचा गजर, शिस्तबद्ध सायकल रॅली आणि जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



१२ जुलै रोजी पंढरपूर येथे सर्व सायकलिस्ट वारकरी भव्य रिंगण सोहळा आणि नगर प्रदक्षिणेत सहभागी होणार असून, त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणीचे (पान २ वर)

# गटई कामगारांना लोखंडी पत्र्याचे स्टॉलसाठी नविन अर्ज करण्याचे आवाहन

**जालना – प्रतिनिधी**

गटई स्टॉल योजना ही अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, बोर, होलार, मोची इत्यादी) लोकांसाठी असून त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने सुरू केली आहे. सदर योजनेत माहनगरपालिका, नगरपालिका, छावणी क्षेत्र आणि ग्रामपंचायत क्षेत्रात, १०० टक्के शासकीय अनुदान तत्वावर पत्र्याचे स्टॉल देण्यात येतात.

शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

योजनेच्या अटी व शार्तीमध्ये महत्वाचे बदल: –महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.अनुसूचति जाती प्रवर्गातील असावा. (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी),अर्जदाराचे वय १८ वर्ष पूर्ण असावेत.गटई कामगारांना १०० टक्के अनुदान तत्वावर पत्र्याचे स्टॉल वर पहिले ५०० रु अनुदान,देण्यात येते होते सदर शासन निर्णयानुसार ५००० रु कमाल अनुदान द्वारे देण्यात येणार आहे.कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अट ही ग्रामीण भागात ४० हजार वरून ८० हजार इतकी करण्यात आलेली आहे.कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अट ही शहरी भागात ५० हजार वरुन १ लक्ष करण्यात आलेली आहे.अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असल ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावणी बोर्ड (कटक मंडळ) किंवा महानगरपालिका यांनी त्या भाड्याने, कराराने, खरेदीने, अगर मोफत परंतु अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी किंवा ती त्याच्या स्वमालकीची असावी.एका कुटुंबात एकाच लाभार्थ्यास अर्ज करात येईल.

त्यानुषंगाने जालना जिल्ह्यात इच्छुक गटई लाभार्थ्यांनी दि. २४ जुलै २०२६ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत प्रस्तुत कार्यालयास जास्तीत जास्त अर्ज करावेत व सदर (पान २ वर)

# शेतकऱ्यांना नापिकी आणि कर्ज या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी योजना

**जालना – प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६ राज्यातील शेतक–यांना निसर्गाचा लहरीपणा सांभाळत शेती करावी लागते आणि त्या शेतीसाठी मेहनत घेऊनही अनेकदा अतिवृष्टी दुष्काळ यामुळे पिकांचे नुकसान होत असते. पीक आले नाही तर उत्पन्न नाही आणि परिणामी शेतीसाठी बँकेकडून घेतलेले कर्ज फेडणे शक्य होत नाही. या मुळे शेतकरी वर्ग सतत चिंतेत असतो. शेतकरी वर्गास नापिकी आणि कर्ज थकणे या दुष्टचक्रात अडकून पडावे लागते.

शेतकरी वर्गास प्राधान्य देणाऱ्या सरकारने यासाठीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना २०२६ ही जाहिर केली आहे. या रूपाने ही आजवरची सर्वात मोठी आणि राज्यातील ५८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ देणारी महाकर्जमुक्ती ठरली आहे. शेतकरी बांधवांना २लाख रुपयांपर्यंत असणारे कर्ज माफ होणार आहे. ज्यांचे कर्ज २ लाखांपेक्षा अधिक आहे अशा शेतकऱ्यांनी २लाख रुपयांपेक्षा जादा असलेला थकीत कर्जाची रक्कम भरल्यानंतर त्यांनाही याचा लाभ मिळणार आहे. आणि जे शेतकरी कर्ज घेऊन त्याची नियमित परतफेड करतात अशा शेतकऱ्यांचाही विचार या योजनेत झाला आहे. नियमित कर्जाचे हप्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम या कर्जमुक्ती मोहिमेत दिली जाणार आहे.शासन स्तरावर शेतकरी वर्गास प्राधान्य देण्याची जी भूमिका आहे त्याचाच एक भाग म्हणून याकडे आपणास बघता येईल.

शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतानाच पिकाचा विमा घेण्याचा सल्ला दिला जातो आणि त्यांच्या पिकाचा विमा देखील काढला जातो. ही योजना प्रधानमंत्री फसल विमा म्हणून सर्वांना परिचित आहे. या अंतर्गत वेळोवेळी पिकाचे नुकसान आलेल्या शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी भरपाई दिलेली आहे.

बीड जिल्हा हा मुख्यत्वे शेतीवर आणि अनुषंगिक व्यवसायांवर आधारित आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत शेतकऱ्यांना २ लाखांची कर्ज माफ योजना लाभाचीच ठरणार आहे. मात्र यापूर्वीही शासनाने आपली लक्ष्यात घेऊन वेळोवेळी शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती शेतीपीक अनुदान वाटप केलेले आहे. याचाही नोंद यावेळी घेतली पाहिजे. जिल्ह्यात २०२५–२६ च्या खरिप हंगामात अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टी या दोन्हीमुळे जिल्ह्यात शेतीपिकाचे नुकसान झाले होते. त्यासाठी शासनाने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना १ हजार ४५८ कोटी रुपयांहून अधिक रक्कम देऊ केली सोबतच याचवर्षी रब्बी हंगामात पेरणीसाठी अनुदान म्हणून ६५० कोटी रुपये अनुदान दिले. सोबतच पिक विमा भरपाई वेगळी आहे आणि त्यानंतर आता या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी २०२६ याअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्यास २ लाख रुपये कर्जमाफी देखील दिली आहे. शेतकरी हा मुख्य घटक मानुन शेतकरी हित केंद्रीत या सर्व भूमिकेमुळे शासन शेतकऱ्याला नापिकी आणि कर्ज या दुष्टचक्रातून मुक्त करण्यास कटिबद्ध आहे याचीच खात्री शेतकऱ्यांना दिली आहे.

# दोन शस्त्रक्रिया करूनही किडनी स्टोन काढला नाही; रुग्णालयाला १.१५ लाखांचा दंड

**जालना – प्रतिनिधी**

दिल्ली राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाने वैद्यकीय निष्काळजीपणा आणि सेवेतील त्रुटीसाठी एका खाजगी रुग्णालयाला जबाबदार धरण्याचा जिल्हा आयोगाचा निर्णय कायम ठेवला आहे. दोन शस्त्रक्रिया करूनही रुग्णाच्या किडनीतील स्टोन काढण्यात अपयश आल्याने के. के. सर्जिकल अँड मॅटर्निटी हॉस्पिटल आणि संबंधित डॉक्टर यांना नुकसान भरपाई म्हणून १ लाख रुपये आणि खटल्याच्या खर्चासाठी १५,००० रुपये देण्याचे निर्देश दिले आहेत. या निकालामुळे वैद्यकीय सेवांमध्ये रुग्णांच्या हक्कांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, ग्राहकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहावे, असे आवाहन जालना येथील नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी केले आहे.

मोहम्मद समीर नावाच्या रुग्णाला १० एप्रिल २०१६ रोजी उजव्या बाजूला युरेटेरिक कॅल्क्युलस (किडनी स्टोन) असल्याचे निदान झाले होते. त्यांना सुरुवातीला गुरु तेग बहादूर रुग्णालयात शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला होता, परंतु तिथे सर्जन उपलब्ध नसल्याने त्यांनी के. के. सर्जिकल अँड मॅटर्निटी हॉस्पिटलमध्ये धाव घेतली. ११ जुलै २०१६ रोजी ३२,००० रुपये भरल्यानंतर त्यांना दाखल करण्यात आले, जिथे डॉ. रजनीश शर्मा यांनी ओपन शस्त्रक्रियेऐवजी एंडोस्कोपिक प्रक्रिया (आरटी युआरएस) केली आणि स्टोन काढण्याची हमी दिली. मात्र, काही काळानंतरही रुग्णाला तीव्र वेदना होत होत्या. १२ ऑगस्ट २०१६ रोजी रुग्ण पुन्हा तपासणीसाठी रुग्णालयात गेला असता, एक्स–रे केल्यानंतर स्टोन अपेक्षेपेक्षा मोठा असल्याचे सांगून दुसऱ्या शस्त्रक्रियेची गरज असल्याचे सांगण्यात आले. त्यासाठी अतिरिक्त ३,५०० रुपये जमा करण्यास सांगून दुसरी शस्त्रक्रिया करण्यात आली. स्टेंट काढल्यानंतरही रुग्णाला आराम मिळाला नाही. त्यानंतर, ३० नोव्हेंबर २०१६ रोजी केलेल्या अल्ट्रासाऊंडमध्ये उजव्या युव्ही जंक्शनवर १७.२ मि.मी. आकाराचा स्टोन असल्याचे उघड झाले, ज्यामुळे शस्त्रक्रियेनंतरही स्टोन तसाच असल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणाची दखल घेण्यासाठी गुरु तेग बहादूर रुग्णालयात एक तज्ञ समिती स्थापन करण्यात आली. समितीने वैद्यकीय नोंदी तपासल्या असता, ऑपरेशन थिएटरच्या नोट्स, ज्यात शस्त्रक्रियेचे तपशील नमूद असतात, त्या गायब असल्याचे आढळून आले. तसेच, केवळ तीन महिन्यांच्या कालावधीत १.५ सेमी ते १७.२ मि.मी. आकाराचा नवीन स्टोन तयार होणे अत्यंत अशक्य असल्याचे मत समितीने नोंदवले. यानंतर पीडित रुग्णाने जिल्हा ग्राहक आयोगाकडे वैद्यकीय निष्काळजीपणाबद्दल तक्रार दाखल केली होती, जिथे आयोगाने रुग्णालय आणि डॉक्टरांना दोषी ठरवले होते.

या निर्णयावर बोलताना नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, ''दिल्ली ग्राहक आयोगाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असून तो वैद्यकीय सेवा घेणाऱ्या प्रत्येक नागरिकासाठी एक आशेचा किरण आहे. डॉक्टर आणि रुग्णालये हे सेवा प्रदाता असून, ते ग्राहक (पान २ वर)

# ग्रामपंचायत संगणकपरिचालकांचा १४ वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी लावा

## आ. बबनराव लोणीकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बैठक घेण्याची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये मागील १४ वर्षांपासून कार्यरत असलेल्या सुमारे २० हजार संगणकपरिचालकांचा कर्मचारी दर्जा, किमान वेतन आणि नियमित मानधनाचा प्रश्न तातडीने सोडवावा, यासाठी माजी मंत्री तथा परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक आयोजित करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील सुमारे २८ हजार ५०० ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत संगणकपरिचालक ग्रामीण भागातील जवळपास ७ कोटी नागरिकांना विविध ऑनलाइन व ऑफलाइन शासकीय सेवा उपलब्ध करून देत आहेत. मात्र एवढी महत्त्वाची जबाबदारी पार पाडूनही त्यांना अत्यल्प मानधन मिळते आणि तेही अनेकदा सहा-सहा महिने रखडते. त्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे.

संघटनेने यावलकर समितीने ३० मे २०१८ रोजी सादर केलेल्या अहवालाचा तसेच ११ जानेवारी २०२३ रोजी तत्कालीन ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयांचा उल्लेख करत संगणकपरिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्याची मागणी पुन्हा अधोरेखित केली आहे.

निवेदनानुसार, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पासाठी राज्याच्या निधीतून वार्षिक ३३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याची घोषणा केली होती. तसेच १० ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत यासंदर्भात निर्णय झाल्याचेही सामाजिक माध्यमांतून प्रसारित करण्यात आले होते.

मात्र, ११ ऑक्टोबर २०२४ रोजी ग्रामविकास विभागाने काढलेल्या शासन निर्णयात कर्मचारी दर्जा, किमान वेतन किंवा ३३६ कोटी रुपयांच्या निधीचा कोणताही उल्लेख करण्यात आला नाही. याबाबत संघटनेने त्याच दिवशी शुद्धीपत्रक काढण्याची मागणी केली होती. तथापि, त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. उलट ५ ऑगस्ट २०२५ रोजी संबंधित शासन निर्णय रद्द करण्यात आल्याने संगणकपरिचालकांवर अन्याय झाल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

संघटनेने शासनाला आणखी एक महत्त्वाची आठवण करून देताना म्हटले आहे की, १६ मार्च २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ग्रामपंचायतींकडून मानधन न मिळाल्यास शासनाकडून ती रक्कम (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.